MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479

आज़ादी का
अमृत महोत्सव

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. I, Issue- LXII, 03 May 2022



# २१ व्या शतकात महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची प्रासंगीकता

* संपादक *
प्रा.डॉ. सिध्देश्वर रामचंद्र शेटकर
सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख
संजीवनी महाविद्यालय चापोली, ता. चाकुर, जि. लातुर.

Add[illegible]espondence
Mr[illegible]man Shete
Editor in Chief : Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Reffered)
Principal, Sanskriti Public School, Nan[illegible] (MH, India) Email : shrishprakashan2009@gmail.com
Dr. Rajesh G. Umbarkar
House No. 624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (Kh.) Nanded - 431605 (India - Maharashtra)
Email - umbarkar.rajesh@yahoo.com, shrishprakashan2009@gmail.com Mob. No. 9623979067
Director : Mr. Tejas Rampurkar (For International Contacts only + 91-8857894082)
(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

# INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of Author | Page No. |
|---|---|---|---|
| 01. | RELEVANCE OF VALUE EDUCATION OF MAHATMA BASAWESHWARA IN THE CONTEXT OF GLOBAL ERA | Dr. Maheshwar G. Kallave | 01 |
| 02. | MAHATMA BASWESHWAR: A SOCIAL REVOLUTIONIST DURING MIDVALE PERIOD IN INDIA | Suryakant D. Somwanshi<br>Dr. Deepak S. Dharwadkar | 04 |
| 03. | MAHATMA BASWESHWARA AND VIRSHAIVISM: AN INTRODUCTION | Dr. M. D. Pathan | 08 |
| 04. | महात्मा बसवेश्वर | डॉ. माया सगरे – लक्का | 11 |
| 05. | सामाजिक क्रांतीचे प्रणेते : महात्मा बसवेश्वर | प्रा. डॉ. नारायण कांबळे | 14 |
| 06. | क्रांतिकारक चळवळीचे प्रवर्तक: महात्मा बसवेश्वर | प्राचार्य डॉ. एस. बी. अडकीने<br>डॉ. सी. एम. कहाळेकर | 21 |
| 07. | महात्मा बसवेश्वर यांचे सामाजिक व धार्मिक कार्य | डॉ. नवगणकर राजाभाऊ व्यंकटराव | 25 |
| 08. | समाजसुधारणेचे प्रणेते महात्मा बसवेश्वर | प्रा. नारायण दत्तात्रय बनसोडे | 30 |
| 09. | महात्मा बसवेश्वरांचे अस्पृश्यता निर्मुलन विषयक विचार व कार्य | प्रा. डॉ. अशोक गंगाराम अंभोरे | 38 |
| 10. | महात्मा बसवेश्वर कालीन सामाजिक परिस्थिती | डॉ. साईनाथ राधेशाम बनसोडे | 40 |
| 11. | आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर | डॉ. नानासाहेब पाटील | 43 |
| 12. | महात्मा बसवेश्वर आणि सामाजिक क्रांती | डॉ. चंदन एम. बावलगावे | 46 |
| 13. | १२ व्या शतकातील समाजसुधारक महात्मा बसवेश्वर | प्रा. डॉ. शेकोबा परशुराम ढोले | 50 |
| 14. | महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याचा समाजावर झालेला परिणाम | डॉ. भिमराव पुंडगे | 56 |
| 15. | जागतिक मानवतावादाचे सूत्र : बसवतत्व | प्रा. डॉ. शंकर विभुते | 61 |
| 16. | श्री महात्मा बसवेश्वर बाराव्या शतकातील पहिले समाजसुधारक | प्रा. पेठकर गणेशकुमार सोपानराव | 65 |
| 17. | महात्मा बसवेश्वरांचे स्त्रीविषयक कार्य | सहा. प्रा. शिवकुमार उस्तुर्गे | 68 |
| 18. | "महात्मा बसवेश्वरांच्या वचनांतील सामाजिक मूल्ये विचारांचा आढावा" | संतोष एकनाथ सुर्वे | 72 |
| 19. | लिंगायत एक स्वतंत्र धर्म | प्रा. डॉ. गोरे बी. एम. | 77 |
| 20. | महात्मा बसवेश्वर यांच्या शरण चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. दगडू नरसिंगराव दामावले | 80 |
| 21. | महात्मा बसवेश्वर एक समाजसुधारक | स्वामी वीरभद्रेश्वर सामलिंग | 85 |
| 22. | महात्मा बसवेश्वरजीवन परिचय | प्रा. देसाई प्रभाकर बाळाभाऊ | 88 |
| 23. | कृतिवंत महात्मा बसवेश्वर | प्रा. डॉ. भालेराव गोविंद पद्माकरराव | 91 |
| 24. | अंधश्रध्दा निर्मूलना विषयी महात्मा बसवेश्वरांचे वचने | श्री. काळगापुरे जी. ए. | 93 |
| 25. | महात्मा बसवेश्वर जीवनचरित्र आणि कार्य | प्रा. डॉ. एस डी. ढवळे | 95 |
| 26. | महात्माबसवेश्वर यांच्यावचन साहित्याचा शोध व बोधएक दृष्टीक्षेप | प्रा. अर्जुन बी. गजमल | 101 |
| 27. | जगत्ज्योति महात्मा बसवेश्वर यांचे विविध विचारवंतांनी मांडलेले विचार | प्रा. डॉ. संतोष कल्याणराव मंगनाळे | 105 |
| 28. | समाजसुधारक : संत महात्मा बसवेश्वर | प्रा. डॉ. जे. टी. कांबळे | 111 |
| 29. | महात्मा बसवेश्वरांचे स्त्रीविषयक कार्य | डॉ. चंद्रशेखर पाटील | 116 |
| 30. | बसव आणि बुध्द विचारांची एकविसाव्या शतकातील प्रासांगिकता | डॉ. संतोष संग्राम शेंबाळे | 118 |




Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

# महात्मा बसवेश्वरजीवन परिचय

प्रा. देसाई प्रभाकर बाळाभाऊ
वाणिज्य विभाग, तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव ता. सेनगाव जि. हिंगोली.

**प्रस्तावना:-**

बाराव्या शतकात कर्नाटक राज्यात विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी या छोट्याशा गावी अक्षय शुद्ध तृतीयेच्या शुभमुहूर्तावर सन 1131 मध्ये थोर शिवभक्त मादिराज व मादलंबिका यांच्या पोटी बसवेश्वर यांचा जन्म झाला. तत्कालीन सामाजिक धार्मिक, आर्थिक परिस्थितीचा अभ्यास जर केला तर चातुर्वर्ण्य व्यवस्था होती. आणि माणसामाणसांमध्ये भेदभाव केला जात होता. जातीव्यवस्था ही वर्णव्यवस्थेचे परीणीती होती. वर्णव्यवस्थेचे विकृत विद्रूप रुप म्हणजेच जातीव्यवस्था. स्त्री- पुरुष भेदाभेद होता. लोक जाती- पाती, वर्णव्यवस्थेत व अंधश्रद्धेत गुरफटून गेले होते. विशेषत: वीरशैव धर्माला ग्लानी आली होती. या धर्माचे अनुयायांवर इतर धर्मांच्या विचाराचा व आचरणाचा पगडा वीरशैव धर्मावर पडू लागला होता. अशा कालावधीत महात्मा बसवेश्वर यांचा जन्म झाला. जन्मताच महात्मा बसवेश्वर शांत, चिंतनशील, विवेकनिष्ठ व चिकित्सक वृत्तीचे असल्याने त्यांना बालपणापासूनच समाजातील अंधश्रद्धा, वाईट चालीरीती, पशुहत्या, जातीभेद या गोष्टींना विरोध होता. यज्ञात दूध- तूप का व्हरे टाकायचे, निष्पाप प्राण्यांचा बळी का घ्यायचा, माणसामाणसांत भेद का करायचा, स्त्रियांना विषमतेची वागणूक का व कशासाठी अशा अनेक प्रश्नांची उत्तरे बाल बसवेश्वर विचारु लागले. घरात व बाहेर त्यांना वरील प्रश्नांची समाधानकारक उत्तरे कोणीही देऊ शकले नाही. विकृत व कर्मठ मनोवृत्तीच्या समाजव्यवस्थेचा त्यांना तीव्र संताप येत होता. बाल बसवेश्वर अनिष्ट रूढी व परंपरा याबाबतीत त्यांच्या आई- वडिलांनाही अनेक वेळा याबाबतीत विरोध करत होते. मुलगा व मुलगी असा भेद करणारा संस्कार म्हणजे व्रतबंधन असे महात्मा बसवेश्वर यांनी सांगितले. माझ्यापेक्षा वयाने मोठ्या असणाऱ्या बहिणीचे वृत्तबंधन होत नसेल तर मला असा संस्कार नको म्हणून त्यांनी विरोध केला. नातेवाईक व गुरूंनी त्यांना वृत्त बंधन नाकारल्यास जननी व जन्मभूमीचा त्याग करावा लागेल अन्यथा संस्कार स्वीकारावा लागेल असा पर्याय ठेवल्यानंतर त्यांनी क्षणाचाही विलंब न करता बालपणीच क्रांतीचा पहिला झेंडा रोवला व जातवेद मुनींचे कुंडलसंगम स्थित आश्रमात ते राहू लागले. तेथे त्यांनी सर्व शास्त्रांचा अभ्यास केला. सतत बारा वर्ष धर्मदर्शनाचा अभ्यास केला. स्वचिंतनामुळे महात्मा बसवेश्वर स्वतंत्र विचारांची मांडणी करू लागले. अज्ञान अंधकारात पिचलेल्या समाजाला जागे करत नवसमाज घडविण्याचा विचार मनाशी बाळगू लागले. अशाच एका यात्रेच्या दिवशी सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढे या गावची मंडळी यात्रेच्या निमित्ताने कुडलसंगम येथे आली. त्यावेळी महात्मा बसवेश्वर यांचे नाव सर्वतोमुखी झाले होते. प्रकांड ज्ञानी, मितभाषी, प्रसन्न चेहरा आणि नम्र स्वभाव, मधुर बोलणे इत्यादी गुणांमुळे महात्मा बसवेश्वर सर्वांना आवडत. कालांतराने त्यांची कीर्ती हळूहळू कुडलसंगम च्या पंचक्रोशीत पसरु लागली. प्रत्येक जण महात्मा बसवेश्वर यांची कीर्ती गाऊ लागले. त्यावेळी मंगळवेढ्यात चालुक्य राजाचा सामंत म्हणून राजा बिज्जल राज्य करीत होता. त्या राजाच्या पदरी महात्मा बसवेश्वर यांचे मामा बलदेव दंडाधिकारी म्हणून नोकरीस होते. त्यांची सुकन्या गंगाबिका उपवर झाली होती आणि आपल्या कन्येला असा पती लाभावा या विचारात बलदेव होते. त्यांनी आपली मुलगी महात्मा बसवेश्वरांना देऊन त्यांना मंगळवेढ्यात आणले. महात्मा बसवेश्वर यांचे तत्वज्ञान त्याकाळी महाराष्ट्र- कर्नाटक यांना जोडणारा दुवा ठरले होते.

महात्मा बसवेश्वरांच्या समाज परिवर्तनाच्या ऐतिहासिक महत्त्वाच्या कार्यात त्या दोघींचा सहभाग अत्यंत मौलिक स्वरूपाचा होता. महात्मा बसवेश्वरांच्या सरळ आणि नम्र स्वभावामुळे प्रजाजनांत देखील त्यांची प्रतिमा उज्वल झाली. समाजसुधारणेचे आपले क्रांती कार्य पुढे नेण्यासाठी त्यांना या पदाचा उपयोग झाला. नकळतच महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याला सामाजिक आणि राजकीय प्रतिष्ठा प्राप्त झाली. बाराव्या शतकात कर्नाटक आणि महाराष्ट्र यांना जवळ आणण्याचं कार्य महात्मा बसवेश्वरांनी केलं हे एक ऐतिहासिक सत्य आहे. त्याच काळात

चालुक्य राजे दुबळे व कार्यक्षम झाले त्याचा फायदा त्यांच्या सामंतांनी आणि मंडलिकांनी घेतला मंगळवेढ्याचे सामंत राजे बिज्जल स्वतंत्र झाले आणि चालुक्यांची सत्ता झुगारुन दिली आणि आपल्या सार्वभौमत्वाची घोषणा केली. मंगळवेढ्याहून बिज्जलानी आपली राजधानी हलविली आणि कर्नाटकात कल्याण- नगरीत वसवली. धार्मिक आणि सामाजिक सुधारणा हे महात्मा बसवेश्वर यांचे मुख्य कार्य होते. महात्मा बसवेश्वर यांच्या प्रेरणेने कल्याण नगरीत अनुभव मंटपाची स्थापना करण्यात आली होती. महान तत्वज्ञानी अल्लम देव प्रभू हे त्या मंटपाचे अध्यक्ष होते. निरनिराळ्या भागांतून आलेल्या शिवशरणानी लिहिलेली वचने येथे वाचून दाखविण्यात येत होते. अचूक आणि निर्दोष असलेली वचने वीरशैवांच्या साहित्यात या वचनांना अढळस्थान प्राप्त होई. अशी वचने रचणारे जाणकार सर्व जातीतून या मंटपात सभासद म्हणून सामील करून घेतलेले असतात. त्यापैकी मडिवाळ माचीदेव ( धोबी ) मेदार केतय्या (बुरुड), मादर चनैया (मांग ), किन्नरी ब्रोमैया ( सोनार), शिवनाथ मय्यार (महार ), शंकर दासीमय्या (शिंपी), ढोर कक्कय्या (ढोर ), समगार हारळया (चांभार), मधुवरस (ब्राह्मण), इत्यादी या अनुभव मंटपात पुरुष शरण होते. पुरुष शरणांच्या बरोबरीने शेकडो महिला देखील होत्या. त्या काळात सार्वजनिक कार्यात महिलांना अनेक ठिकाणी संधी नव्हती. त्या काळात अनुभव मंटपात महिलांना 50 टक्के आरक्षण महात्मा बसवेश्वरांनी दिले

**महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक कार्याचा आढावा**

**भारतीय लोकशाही संसदेची स्थापना :-**

बसवण्णांनी मंगळवेढा येथे "लोकशाही संसद म्हणजेच 'अनुभव मंटपाची' स्थापना केली. या अनुभव मंटपात सर्व धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक अडचणींवर कशी मात करावी यावर चर्चा करण्याचे कार्य चालत असे. बसवण्णांनी समाजातील रूढीपरंपरा, वाईट चालीरीती यांना विरोध करून समाजाच्या हितकारक गोष्टींची अंमलबजावणी करणारी नवीन यंत्रणा तयार केली.( बाराव्या शतकातील आदर्श प्रशासक ,समतेचे प्रणेते म्हणून महात्मा बसवेश्वरांना ओळखले जाते.सर्व प्रथम लोकशाही मूल्याची सुरूवात ही म.बसवेश्वरांनी 12 व्या शतकात अनूभव मंटपाच्या माध्यमातून केल्याचे वचनसाहित्यातून दिसून येते.एकूणच त्यांनी वचनसाहित्यात समता, मूल्य, न्याय, बंधूता, एकात्मता तसेच स्वातंत्र्य, अधिकार, नियंत्रण व शिस्त, सूशासन आणि प्रशासन आदी बाबींवर सखोल विवेचन केले आहेत.सद्यस्थितीत शासन व प्रशासनाला या विचारांचा अवलंब केल्यास निश्चितच देशात निर्माण होणारी विषमता, हिंसा, भेदभाव व जातीय राजकारण इ.समस्यावर(पायबंद) आळा घालता येईल. परिणामतः चांगले सुशासन व प्रशासन व्यवस्था निर्माण होइल

**महात्मा बसवेश्वर आणि शरण चळवळ :-**

अग्रजापासून अंत्यजापर्यंत सर्वजण महात्मा बसवेश्वर महाराजांच्या शरण चळवळीत सामील झाले. त्या चळवळीत झालेल्या सहभागी पुरुषांना आणि स्त्रियांना लिंगदीक्षा घेऊन गळयात शिवलिंग धारण केल्यानंतर अनुक्रमे शरण-शरणी अशी नावे मिळाली. शरण चळवळीचे रूपांतर पुढे वीरशैव लिंगायत धर्म प्रचार व प्रसरामध्ये झाले. लिंग धारण केलेल्या शरणांची पूर्वाश्रमीची जात नष्ट झाली. अग्रज-अंत्यज यांच्यात रोजी बेटी व्यवहार सुरू झाले जातीच्या भिंती तुटून पडल्या महात्मा बसवेश्वरांच्या शरणचळवळरूपी झाडाला समता, समानता, बंधुता, विवेक, कायक, दासोह याची फळे आली. समाजाच्या प्रत्येक थरातून स्त्री-पुरुष महात्मा बसवेश्वरांच्या वीरशैव लिंगायत चळवळीत सामील झाले, ते शरण झाले. शरण म्हणजे गळयात शिवलिंग धारण करून शरण परिवारात राहणारा, वचनांवर विश्वास ठेवणारा, नित्य, सत्य-शुद्ध दासोह करणारा, चर्चा-अनुभाव-अनुभव करणारा, लिंग-जाती इ. भेद न मानणारा, मुक्त व्यक्ती म्हणजे शरणी-शरण पण हीच व्याख्या २१ व्या शतकाला अनुसरुन करावी लागेल, ती अशी होईल- निजमुक्त, निर्मोही, जाती-लिंग-वर्ण-वर्ग इ. भेद विरहित, कायकनिरत, दासोही, अनुभवी म्हणजेच शरण.

मातंग चेन्नय्या, डोहर कक्कय्या, हडपद अप्पाण्णा, नुलीय चंदय्या, कुंभार गुंडय्या, चांभार हरळय्या, अंबिगर चौडय्या, मेदार बुरुड केतय्या, तुरुंगाहि रामण्णा, मादार धूळय्या, वैद्य संगण्णा, कन्नप्पा तेली, किन्नरी बोमय्या,

अल्लमप्रभु, बहुरूपी चौडय्या, शरण सुरय्या, शरण उरलिंगदेव हे शरण शुद्रातिशूद्र समजल्या जाणाऱ्या जातीतून बसवांच्या चळवळीत सहभागी झाले. सुळे मक्कव्वे, सुळे पद्मलदेवी, सुळे चामलदेवी यांसारख्या वेश्या बसवांच्या विचाराला प्रभावित होऊन शरणी झाल्या. वेश्या आपला पूर्वाश्रमीचा व्यवसाय आणि पूर्वाश्रम सोडून पुण्यांगना झाल्या. चोर, लुटारू, दरोडेखोर यांनी आपले दुष्कृत्य सोडून दिले. ते शरण बनले. दारू विकणारा हेड्ड मारय्या वाटसरूंच्या सेवेसाठी पाणी, दूध आणि ताक विकायला लागला.

**शिवानुभवमंटप स्थापना :**

बसवेश्वरांनी कल्याण येथे निर्माण केलेली शिवानुभवमंटप म्हणजेच अनुभवमंटप ही संस्था जागतिक धर्मेतिहासातील अनन्यसाधारण संस्था होय. वेगवेगळया जातींतील व व्यवसायांतील भक्त म्हणजेच शिवशरण येथे एकत्र जमत आणि विविध विषयांवर चर्चा करीत असत. बसवेश्वरांनी धर्मप्रसारासाठी संन्यास घेतला नाही, ग्रंथ लिहिली नाहीत वा प्रवासही केला नाही परंतु मंटपातील चर्चेच्या माध्यमातून त्यांनी लोकांमध्ये जागृती केली. येथे परिसंवादाच्या स्वरूपाची जी चर्चा होत असे, तीच कन्नड साहित्यामध्ये वचनसाहित्याच्या रूपाने प्रसिद्ध झाली. या मंटपातील शून्यपीठाचे अध्यक्षपद *अल्लमप्रभू* (बारावे शतक) यांना देण्यात आले होते. येथे होणाऱ्या चर्चेच्या माध्यमातून बसवेश्वरांनी वेगवेगळया जातिजमातींच्या लोकांमध्ये बंधुभाव आणि विचार-स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण केली.

पारंपारिक भारतीय समाजातील वर्णजातिमूलक उच्चनीचता व विषमता यांची प्रखर जाणीव बसवेश्वरांना झाली होती. म्हणूनच त्यांनी चातुर्वर्ण्याला आव्हान देऊन सर्व मानवांना समान मानले. परिणामतः त्यांच्याभोवती सर्व वर्णातील व जातींतील अनुयायी जमा झाले. आंतरजातीय रोटीव्यवहार व बेटीव्यवहार करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. उदा., त्यांच्या अनुयायांमध्ये मधुवय्या नावाचा ब्राह्मण व हरळय्या नावाचा चांभार यांचा अंतर्भाव होता. त्यांनी मधुवय्याच्या मुलीचे हरळय्याच्या मुलाशी लग्न लावून दिले. त्यांनी शिवनागमय्या व ढोर कक्कय्य या अस्पृश्यांच्या घरी जाऊन भोजन केले होते. बाराव्या शतकात बसवेश्वरांनी सुरू केलेले हे कार्य निश्चित क्रांतिकारक होते

**अध्यात्मिक विद्यापीठाची स्थापना**

गुरु जातवेदमुनींनी बसवेश्वरांना ज्ञानप्रसारासाठी आणि वीरशैव धर्माच्या प्रचारासाठी दक्षिणेतील कलचुरी या ठिकाणी पाठविले. वसवेश्वरांनी या काळात अनेक लोकोपयोगी कामे केली. अनेक अनिष्ट चालीरिती बंद केल्या. बालविवाहाला कडाडून विरोध करून विधवा विवाहाला मान्यता दिली. बसवेश्वरांनी 'शिवानुभवमंडप' नावाच्या आध्यात्मिक विद्यापीठाची स्थापना केली. या विद्यापीठाच्या माध्यमातून बसवेश्वरांनी विश्वशांती आणि विश्वबंधुत्वाचा संदेश देऊन आत्मोद्धाराचे आणि लोकोद्धाराचे मानवतावादी कार्य केले. माणसासारखा माणूस असूनसुद्धा त्याचा विटाळ दुसऱ्यांना का होतो, असे अनेक अनाकलनीय प्रश्न ज्यांच्या मनात उभे राहिले, त्या बसवाण्णांनी स्त्री-पुरूष समानतेचा उद्घोष करणाऱ्या व पददलितांना त्यांच्या खरा अधिकार देणाऱ्या वीरशैव लिंगायत धर्माचे पुरूज्जीवन करण्याचे काम केले

**जातीय विषमतेला विरोध :**

बसवाण्णांनी १२ व्या शतकाच्या प्रारंभीच जातीअंताचा लढा आचरणातून आरंभीला होता.समाज व्यवस्थेला लाभलेला अनादी अनंत रोग म्हणजे जातीयवाद. बसवेश्वरांनी केलेला हा विद्रोह व्यवस्थेला सहन झाला नाही म्हणून बसवाण्णांना विज्जलाचे प्रधानपद सोडावे लागले. बसवेश्वरांनी आपल्या वीरशैव लिंगायत धर्मात ज्या तत्त्वज्ञानाचा, आचार- विचार, नितीचा सदुपयोग केला, त्याचाच उपयोग काही शतकांपूर्वी वर्धमान महावीर आणि गौतम बुद्धांनी केला होता. बुद्ध आणि महावीर यांचा काळ वेगळा असला तरी बसवेश्वरांनी स्थळ-काल परत्वे ज्या इष्टलिंग धर्म प्रतिपादनाचे वर्णन केले होते, ते वैचारिकदृष्ट्या गौतम बुद्धांच्या विचारांशी मिळते जुळते आहे. म्हणूनच बसवेश्वरांना १२ व्या शतकातील बुद्ध म्हणून संबोधले जाते.

**संदर्भ:**

१)www.inmarathi.net

२)www.esakal.com

३) आधुनिकतेचे अग्रदूत –महात्मा बसवेश्वर – डॉ. राजशेखर सोलापुरे,अरुणा प्रकाशन लातूर